वाचा :- १) या संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. २२, दि. १९/०४/२०११.
२) या संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. २३, दि. २१/०४/२०११.

४०५

---

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,कोकणभवन, ६ वा माळा,
नवी मुंबई ४०० ६१४

कार्यालयीन आदेश क्र. ३२, दिनांक 13 NOV 2013

विषय :- लेखापरीक्षण कार्यपध्दती : उपरोक्त वाचामधील या कार्यालयाचे आदेश क्र. २२, दि. १९/०४/२०११ मध्ये सुधारणा:

उपरोक्त वाचा क्र. १ मधील लेखापरीक्षणाच्या कार्यपध्दतीचे सविस्तर आदेश संचालनालयाने निर्गमित केलेले आहेत. सदर आदेशातील **" मुद्दा क्र. ८ - लेखापरीक्षण मासिक कार्यक्रम आखणी (अ) "** मधील मजकूर समाविष्ट करताना प्राधान्याने असा विचार करण्यात आला होता की, लेखापरीक्षणाचा कार्यक्रम हा जिल्हा कार्यालयातील लेखापरीक्षकांच्या सेवा आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन जिल्हा सहाय्यक संचालक यांनी आखावा आणि त्याची प्रत माहितीसाठी संबंधित विभागीय सह संचालक यांना पाठवावी- जेणेकरुन सहाय्यक संचालकांना स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन निर्णय घेता येईल आणि विभागीय सह संचालकांना पर्यवेक्षीय कामासाठी अधिकाधिक वेळ देता येईल.

उपरोक्त वाचा क्र. २ मधील आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता भासली कारण जिल्हा स्तरावरील सर्व लेखापरीक्षकांना सर्व उत्पन्न गटातील ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण करण्याचा पुरेसा अनुभव मिळावा आणि या कामातील त्यांचे कौशल्य वाढावे.

स्थानिक स्तरावर लेखापरीक्षणाचा कार्यक्रम आखणे, ही जिल्हा सहाय्यक संचालकांची जबाबदारी असली तरी त्यांचे नियंत्रक अधिकारी म्हणून विभागीय सह संचालकांचे त्यावर नियंत्रण असणे आवश्यक आहे. प्रशासकीय गरज म्हणून आणि आवश्यकता असेल तेव्हा सदर लेखापरीक्षण कार्यक्रमामध्ये ते बदल करु शकतील. मात्र हा बदल अल्प प्रमाणात आणि अत्यावश्यक असेल तेव्हाच करणे इष्ट आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेऊन वरील वाचा क्र. १ मधील कार्यालयीन आदेशातील " मुद्दा क्र. ८ - लेखापरीक्षण **मासिक कार्यक्रम आखणी (अ) " यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे:**